# UoP notice to college

**REPORTER**
reporters@sakaaltimes.com

**Pune:** The University of Pune (UoP) has served a notice on the Sinhgad Technical Education Society (STES) to clarify on the allegation of forcing students to enroll for autonomous course as a precondition for admission to UoP affiliated management course. The UoP has also sought clarification from the STES for enrolling students to two simultaneous full-time courses, which is a clear violation of regulations.

The varsity has asked the STES to reply in eight days, Vice-Chancellor Dr Narendra Jadhav told mediapersons on Tuesday. Violation of the University Act may lead to cancellation of approval of the course and de-affiliation of the institute, he added.

Student organisations, citing an example of one student Hirendra Agnihotri, on Monday accused the STES of forcing students, who opt for the UoP affiliated course, to take admission to its own autonomous course at exorbitant fees.

Sakal Times 4/6/08

---





समर्थ भारत अभियाना अंतर्गत आयोजित करियर महोत्सवाचे उद्घाटन डॉ.. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले.

## करियर महोत्सव विद्यार्थ्यांना प्रेरणादायी

**- कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव**

**पुणे, दि. ११ (प्रतिनिधी)- प्रत्येक व्यक्तीमधील गुणांचा शोध घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी करियर महोत्सव हे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरतात, असे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले.**

पुणे विद्यापीठाच्या वतीने समर्थ भारत अभियान अंतर्गत आयोजित तीन दिवसाच्या करिअर महोत्सव व एज्युकेशन फेअरचे उद्घाटन डॉ. जाधव यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ते बोलत होते. या वेळी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा विजयशीला सरदेसाई, डॉ. अरुण अडसुळ, डॉ. संभाजी पठारे उपस्थित होते. समर्थ भारत अभियानाद्वारे ग्रामीण भागातील विकासाला चालना देण्याचे काम विद्यापीठांच्या माध्यामातून होत आहे. युवकांनी समाजामध्ये मिसळून, खेड्यापाड्यामध्ये काम करून राष्ट्र विकास साध्य करावा. त्यासाठी युवकातील कौशल्य शोधून त्यांना शिक्षणाच्या योग्य प्रवाहाकडे वळवले तरच राष्ट्राचा विकास होईल, असे जाधव यांनी सांगितले.

प्रभात

---



## प्रेमाचा अर्थ समजावून सांगण्याचे काम साने गुरुजींनी केले-डॉ. देखणे

**पुणे, दि. ११ (प्रतिनिधी)- जीवनातील प्रेमाचा अर्थ खऱ्या अर्थाने जगाला समजावून सांगण्याचे महान कार्य साने गुरुजी यांनी केले, असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक रामचंद्र देखणे यांनी केले.**

साने गुरुजी यांच्या ५८व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पत्री कविता संग्रहावर आधारित कवितांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी देखणे बोलत होते. त्याप्रसंगी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, प्रकाश मोहाडीकर आदी उपस्थित होते.

या वेळी डॉ. देखणे म्हणाले, ''साने गुरुजी यांनी आपल्या जीवनामध्ये प्रेमाला अतिशय महत्त्व दिले. मानवी आदर्शाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे साने गुरुजींचे व्यक्तिमत्त्व होते. खऱ्या अर्थाने प्रेमाचे प्रबोधन करण्याचे काम त्यांनी केले.

समाजावर संस्कार करून एका तत्त्वज्ञाची भूमिका गुरुजींनी भूषवली. 'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे' या प्रार्थनेने तर जगातील संपूर्ण धर्माला प्रेमाची शिकवण दिली.

डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले, ''साने गुरुजी म्हणजे एक संस्काराचे विद्यापीठ होते. मातृहृदयी गुरुजींनी मुलांच्या जीवनामध्ये हास्याचे मळे फुलविले. प्र. के. अत्रे यांनी आपल्या लेखनातून महाराष्ट्राला हसविले; परंतु श्यामची आई सारखा चित्रपट काढून सर्वांच्या डोळ्यातून अश्रू बाहेर काढले.''

प्रभात

---

## साने गुरुजींचे तत्त्वज्ञान व संस्कारांचा अंगीकार करा

### डॉ. नरेंद्र जाधव : शिक्षण व समाजात मोठी दरी

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. १२ : शिक्षण व समाज यांच्यात दरी निर्माण झाली आहे, त्यामुळे समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी साने गुरुजींच्या तत्त्वज्ञान व संस्काराचा अंगीकार केला पाहिजे, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी बुधवारी व्यक्त केले.

साने गुरुजी संस्कार साधना, संगम रंगभूमी, साने गुरुजी कथामाला यांच्यातर्फे पूज्य साने गुरुजींच्या ५८व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरू डॉ. जाधव बोलत होते.

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्रकाश भाई मोहाडीकर होते. संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे, प्रा. प्र. द. पुराणिक, दत्ता पुराणिक, श्यामराव कराळे, प्रा.राजन कुलकर्णी उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, ''साने गुरुजींचे जीवन हे संस्कारांचे विद्यापीठ आहे, तर 'श्यामची आई' हे पुस्तक मराठी साहित्यातील सर्वोत्तम ग्रंथ आहे.''

डॉ. देखणे म्हणाले, ''साने गुरुजी ही मानवी प्रासादिकतेची मूर्ती आहे. ते मानवता व समतेचे वैचारिक अधिष्ठान आहे.''

या वेळी 'संगम रंगभूमी'च्या कलाकारांनी साने गुरुजींनी लिहिलेल्या 'पत्री' कवितासंग्रहातील निवडक कवितांचे गायन केले. साने गुरुजींच्या कवितांवर बाल कलाकारांनी समूह नृत्य केले. प्र. द. पुराणिक यांनी प्रास्ताविक केले.

सकाळ 12/6/08

चिंतन इमेज मेकर्स